सकाळ

• पुणे, शुक्रवार, ३ मे २०१९

# सीबीएसई निकालाची परंपरा कायम

## बारावीत अनेक शाळांचा निकाल शंभर टक्के; मृण्मयी नेरलीकरला ९८ टक्के

**पुणे, ता. २ : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी (सीबीएसई) संलग्न असलेल्या पुण्यातील उच्च माध्यमिक शाळांनी भरघोस निकालाची परंपरा कायम राखली आहे. बहुतांश शाळांचा बारावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विखे पाटील मेमोरियल स्कूलची मृण्मयी नेरलीकर हिला ९८ टक्के गुण मिळाले आहेत.**

चिंचवड येथील ग्लोबल इंटरनॅशनल स्कूलमधील महेक जोहरी हिने फिजिकल एज्युकेशन आणि अनिश अडवानी याने इंफॉर्मेटिक प्रॅक्टिसेसमध्ये शंभरपैकी शंभर गुण मिळविले आहेत. शाळेत तन्वी प्रसाद आणि निवेदिता शिवकुमार हिने ९६ टक्के गुण मिळवत विज्ञान शाखेत पहिला क्रमांक मिळविला, तर वाणिज्य शाखेत सात्विका सतीश, सुनीती गर्ग आणि कला शाखेत महेक जोहरी हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

पिंपरीतील गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूलचा निकाल ९७ टक्के लागला असून, विज्ञान शाखेतील दृष्टी पेशवानी हिला ९६.८ टक्के, शांभावी सभाहित हिला ९६.६ टक्के, तर संजीवनी नाथानी हिला ९६.२ टक्के गुण मिळाले. वाणिज्य शाखेतील सृष्टी शर्मा हिला ९५ टक्के, अक्षदा फणसाळकर हिला ९२.६, तर सोनाली टक्कर हिला ९२.२ टक्के मिळाले.

दिल्ली पब्लिक स्कूल (डीपीएस) आणि विखे पाटील मेमोरियल स्कूलचा निकालही शंभर टक्के आहे. 'डीपीएस'मधील ७७ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. शाळेतील शुभा मुखेरजी हिने ९७.८ टक्के गुण मिळवत पहिला क्रमांक, मेधा अरोरा हिने (९७.४) दुसरा आणि हना वर्गीस (९७.२) हिने तिसरा क्रमांक पटकावला आहे.

विखे पाटील प्रशालेतील विज्ञान शाखेची मृण्मयी नेरलीकर हिने ९८ टक्के गुण मिळवत प्रथम, जय इंगळे (९५.८) याने दुसरा, तर वाणिज्य शाखेतील मौली बन्सल आणि आराधना वैष्णव यांनी ९६.४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला.

औंधमधील डीएव्ही पब्लिक स्कूलमधील २४ विद्यार्थ्यांना ९५ टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. शाळेतील हृतिक गोयल या विशेष विद्यार्थ्याने वाणिज्य शाखेत ८१.६ टक्के गुण मिळविले आहेत. शाळेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेत स्नेहा गोंडुकुपी (९७.६) हिने पहिला, तर वाणिज्य शाखेत किमया पाटील (९६.६) हिने पहिला क्रमांक मिळविला आहे.

### सिटी इंटरनॅशनल व ऑरबिस स्कूलचे यश

वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला आहे. शाळेतील श्रेयस सहारे हा ९६.४ टक्के गुण मिळवत विज्ञान शाखेत प्रथम, सुमेधा पांजा ९६.२ टक्के गुण मिळवत दुसरा आणि स्पंदन घोष ९६ टक्के गुण मिळत तिसरा आला आहे. ऑरबिस शाळेचाही निकाल शंभर टक्के आहे. विज्ञान शाखेत हिमांशू कोरडे याने प्रथम, वाणिज्य शाखेत पीयूष वर्मा याने प्रथम आणि कला शाखेत राशी सिंग हिने पहिला क्रमांक पटकावला आहे.

### केंद्रीय विद्यालयात हृदया प्रशांत प्रथम

लुल्लानगर येथील केंद्रीय विद्यालयाचाही निकाल शंभर टक्के आहे. विज्ञान शाखेत हृदया प्रशांतने (९४ टक्के) प्रथम, वाणिज्य शाखेत तनया कांत हिने प्रथम (९१ टक्के) आणि कला शाखेत शिवराज उबाळे (९०.६) याने पहिला क्रमांक पटकाविला आहे. शाळेतील चौदा विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाल्याचे प्राचार्या मीना जोशी यांनी सांगितले.